जावक क्र. 6878 /२०२३
समर्थ पोलीस स्टेशन, पुणे
दिनांक- १५/१०/२०२३

प्रति,

**मा. जनसंपर्क अधिकारी सो.**
**पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर.**
**यांना सविनय सादर.**

**प्रतिवेदकः**- दिपक यादव, पोलीस उप निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन पुणे.

**विषय** :- बेवारस अनोळखी मयत इसमा बाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, समर्थ पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि नंबर. १०२/२०२३ मधील बेवारस मयत पुरुष इसम (नाव पत्ता माहित नाही) वय अंदाजे - ४० वर्षे हे दि. १४/१०/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा सुमारास सिटी सर्व्हे नं १३८०, भवानी पेठ, पुणे येथील मे. गावडे कंपनी या दुकानाचे जवळ फुटपाथवर बेशुद्ध अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचारकामी मेडिकल यादीसह १०८ ॲम्बुलन्सच्या सहाय्याने ससुन हॉस्पीटल येथे पाठवले असता ससुन हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी तपासणी करुन त्यास उपचारापुर्वी मयत घोषित केले आहे. मयताचे नातेवाईक मिळुन न आल्याने मयत बॉडी ससुन हॉस्पीटल येथील शवागृहात ठेवण्यात आली आहे.

**मयताचे वर्णन खालील प्रमाणे :-**

| | |
|---|---|
|  | बेवारस मयत पुरुष इसम (नाव पत्ता माहित नाही) वय अंदाजे- ४० वर्षे, रंग -सावळा, डोक्याचे केस - लांब (काळे, पांढरे), चेहरा -उभट, कपाळ - मोठे, अंगाने - मध्यम, नाक - सरळ, दाढी – केस लहान, काळे पांढरे, मिशा – केस वाढलेल, काळे पांढरे, उंची – ५ फुट ४ इंच अंदाजे, उजव्या हाताच्या पोटरीवर इंग्रजीत MRAJ असे गोंदलेले<br>कपडेः- ग्रे रंगाचा, फुल बाह्यांचा त्यावर पांढऱ्या रंगाचा चौकडा असलेला शर्ट. तपकीरी रंगाची फुट पॅन्ट, पायात – काळ्या रंगाचा बुट. |

तरी सदर मयताचा व त्याचे वारसांचा तपास होणेकामी सदर मयत इसमाची माहिती सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द होणेस विनंती आहे.

मार्फत-
मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.
समर्थ पोलीस स्टेशन पुणे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
समर्थ पोलीस स्टेशन, पुणे

मा. सादर व्हावे,
दि. १५/१०/२०२३

(दिपक यादव)
पोलीस उप निरीक्षक,
समर्थ पोलीस स्टेशन पुणे